श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558
mahaprasad@siddhivinayak.org
www.siddhivinayak.org

# Nit Document

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई..

## मंदिरातील कर्मचाऱ्यांना सकाळचा अल्पोपहार,चहा आणि दुपारचे भोजन बनविण्याच्या कामाचे कंत्राट देण्याकरीता ई–निविदा मागविण्याबाबत.

## अल्पोपहार,चहा आणि दुपारचे भोजन बनविण्याच्या कामाचा कंत्राट कालावधी मे २०२४ ते ३१ मार्च २०२६

: ई–निविदा सूचना :

मंदिरातील कर्मचाऱ्यांना सकाळचा अल्पोपहार, चहा आणि दुपारचे भोजन बनविण्याच्या कामाचे कंत्राट देण्याकरीता ई–निविदा मागविण्यात येत आहेत. ई–निविदेबाबतची सविस्तर माहिती (अटी व शर्ती) तसेच निविदा अर्ज डाऊनलोड करण्यासाठी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर किंवा www.siddhivinayak.org या न्यासाच्या अधिकृत वेबसाईटला भेट द्यावी.

| | | |
|---|---|---|
| ई निविदा प्रसिध्दीचा वार व दिनांक | :– | सोमवार २९ एप्रिल, २०२४ |
| निविदापुर्व बैठक दिनांक | :– | मंगळवार ३० एप्रिल, २०२४ दु. २.०० वा. |
| ई निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक | :– | बुधवार १५ मे, २०२४ सायंकाळी ४.०० वा. |
| तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | :– | शुक्रवार १७ मे, २०२४ दुपारी २.०० वा. |
| मूल्य निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | :– | शुक्रवार १७ मे, २०२४ दुपारी ३.०० वा. |
| स्थळ | :– | श्रीसिध्दिविनायक मंदिर न्यास, तिसरा मजला, समिती कक्ष न्यास कार्यालय. |

सही/–
(वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel: 022 - 2422 4438 Fax: 022 - 2422 1558
mahaprasad@siddhivinayak.org
www.siddhivinayak.org

# अल्पोपहार व भोजन बनविण्याच्या कामाचे कंत्राट देण्याकरीता ई–निविदा मागविण्याबाबत.

## अल्पोपहार व भोजन बनविण्याच्या कामाचा कंत्राट कालावधी मे २०२४ ते ३१ मार्च २०२६


| अ. क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १ | ई–निविदा मागविण्याबाबतची माहिती, सूचना, वार, दिनांक वेळ | २ |
| २ | निविदेची किमंत, शुल्क, बयाना रक्कम, पतदारी दाखला (Solvency certificate) व आर्थिक उलाढालीबाबतची माहिती | ३ |
| ३ | निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे | ४ |
| ४ | अल्पोपहार बनविण्याच्या कामाचा तपशील | ५ |
| ५ | भोजन बनविण्याच्या कामाचा तपशील | ६ |
| ६ | श्रींचे नैवेद्य बनविण्याच्या कामाचा तपशील | ७ |
| ७ | निविदाधारकाबाबतची माहिती ( फर्म/कंपनीच्या लेटरहेडवर) | ८ |
| ८ | हमीपत्र (नमुना) | ९ |
| ९ | मागील तीन वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल नमूद असणारे सनदी लेखापालाचे पत्र | १० |
| १० | निविदाधारकाने खालीलप्रमाणे प्रत्येक पानावर स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का मारून लिफाफा क्र. १ तांत्रिक निविदा (Technical Bid) सोबत न्यासास सादर करावयाची कागदपत्रे. | ११ |
| ११ | निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाचे बीड ऑफ कोटेशनचा (BOQ) तपशील. | १२ |
| १२ | ई –निविदा मागविण्याबाबतची माहिती | १३ ते १४ |
| | अटी व शर्ती | १५ ते १९ |

## निविदा शुल्क व बयाणा रकमेबाबतचे जोडपत्र "अ"

| अ. क्र. | तपशिल | प्रतिदिन भोजन/अल्पोपहार बनविण्यात येणाऱ्या व्यक्तींची संख्या | निविदेची किंमत/शुल्क (रु.) | बयाणा रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | अल्पोपहार, चहा, दुपारचे भोजन (कर्मचारी आणि हवनाकरीता) | अंदाजे २७५ व्यक्ती | ५,०००/– | १,००,०००/– |

टिप : वर नमूद भोजनाचे प्रमाण हे अंदाजीत आहे. त्यामध्ये घट किंवा वाढ होऊ शकते.

## पतदारी दाखला (Solvency certificate) व आर्थिक उलाढालीबाबत माहिती

| अ. क्र. | तपशिल | प्रतिदिन भोजन/अल्पोपहार बनविण्यात येणाऱ्या व्यक्तींची संख्या | पतदारी दाखला (Solvency certificate) रक्कम (रु.) | अपेक्षित कमीत कमी तीन आर्थिक वर्षाची उलाढाल रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| (अ) | (ब) | (क) | (इ) | (फ) |
| १ | अल्पोपहार, चहा, दुपारचे भोजन (कर्मचारी आणि हवनाकरीता) | २७५ व्यक्ती | प्रति थाळी दरानूसार पुरविण्यात येणाऱ्या दोन वर्षाच्या निविदा मुल्याच्या ३० टक्के | ५०,००,०००/– |

# निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे

खालील तपशीलाप्रमाणे कागदपत्रे तांत्रिक निविदा (Technical Bid) ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावीत.

| अ. क्र. | अपलोड करावयाच्या कागदपत्रांचा तपशील |
|---|---|
| १ | ई–निविदेसोबत निविदेची किंमत/शुल्क जमा केल्याबाबतची इंटरनेट बॅंकेकडील पावती प्रत |
| २ | बयाणा रक्कम (EMD) जमा केल्याबाबतची इंटरनेट बॅंकेकडील पावतीची प्रत |
| ३ | कंपनी नोंदणी दाखला (Shop Act Licence) / ट्रेडिंग लायसेन्स |
| ४ | आयकर नोंदणी पॅन कार्ड |
| ५ | पी. एफ रजिस्ट्रेशनचे प्रमाणपत्राची प्रत. |
| ६ | प्रोफेशनल टॅक्स रजिस्ट्रेशन प्रमाणपत्राची प्रत. |
| ७ | कामगार विमा नोंदणी प्रमाणपत्राची प्रत. |
| ८ | महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळ प्रमाणपत्राची प्रत. |
| ९ | जी. एस. टी. नोंदणी दाखला |
| १० | राष्ट्रीयकृत बॅंकेचा पतदारी दाखला (Solvency Certificate) |
| ११ | आर्थिक वर्ष (२०२०–२०२१, २०२१–२०२२, २०२२–२०२३) आय. टी. आर. रिटर्नस |
| १२ | आर्थिक वर्ष (२०२०–२०२१, २०२१–२०२२, २०२२–२०२३) जी. एस. टी. रिटर्नस |
| १३ | सन (२०२०–२०२१, २०२१–२०२२, २०२२–२०२३) या ३ वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल नमुद असणारे सनदी लेखापाल (Charterd Accountant) यांचे प्रमाणपत्र.<br>**टिप – ३ वर्षाची मिळून आर्थिक उलाढाल ५० लक्षापेक्षा जास्त असावी.** |
| १४ | अनुभवाचा तपशील (तीन वर्ष कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र.) |
| १५ | हमी पत्र |
| १६ | निविदा उघडण्याच्यावेळी कंपनी/संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात त्याचे नांवाचे प्राधिकार पत्राची प्रत. (Authorisation letter) |
| १७ | मुळ निविदा (वाणिज्यिक Commercial) BOQ |

## अल्पोपहार बनविण्याच्यां कामाचा तपशील

अल्पोपहार – (दररोज एकूण २०० व्यक्तींकरीता)

खालीलप्रमाणे कोणताही एक पदार्थ (डीश) सकाळच्या अल्पोपहारासाठी बनविण्यात यावा.

१) कांदे पोहे
२) उपमा
३) मिसळ
४) साबुदाणा वडा (खोबऱ्याची चटणी) उपवासाच्या दिवशी – ३ नग प्रति प्लेट
५) साबुदाणा खिचडी (खोबऱ्याची चटणी) उपवासाच्या दिवशी
६) खमंग ढोकळा (मिरची व कोथिंबीर चटणी) ४ नग प्रति प्लेट
७) शिरा
८) बटाटा वडा (मिरची व कोथिंबीर चटणी) – ३ नग प्रति प्लेट
९) डाळ वडा (मिरची व कोथिंबीर चटणी) – ३ नग प्रति प्लेट
१०) बटाटा भजी (मिरची व कोथिंबीर चटणी)
११) कांदा भजी (मिरची व कोथिंबीर चटणी)
१२) मुग भजी (मिरची व कोथिंबीर चटणी)
१३) मेदु वडा (सांबर) – ३ नग प्रति प्लेट
१४) इडली (सांबर) – ३ नग प्रति प्लेट
१५) कटलेट (मिरची व कोथिंबीर चटणी) ३ नग प्रति प्लेट

वरीलप्रमाणे कोणताही एक एखादा पदार्थ (डीश) बनविल्यानंतर परत तोच पदार्थ (डीश) एक आठवडयानंतर किंवा सर्व पदार्थ (डीश) क्रमाने बनविल्यानंतर परत बनवावी लागेल. तसेच अंगारक संकष्ट चतुर्थी, मंदिरात होणारे उत्सव/कार्यक्रमादिवशी महाप्रसाद विभागाने दिलेल्या सुचनेनुसार वाढीव संख्येनुसार पदार्थ (डीश) बनवावी लागेल.

टीप : वर नमुद कामाचा तपशील हा ढोबळ आहे. त्यामध्ये कमी जास्त बदल होऊ शकतो. न्यासाच्या आवश्यकतेनुसार कंत्राटदारास कामाची पुर्तता करावी लागेल.

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028. *( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558
mahaprasad@siddhivinayak.org
www.siddhivinayak.org

## भोजन बनविण्याच्या कामाचा तपशील

| | |
|---|---|
| दररोज दुपारचे भोजन + हवनाकरीता भोजन (अंदाजित २७५ व्यक्तीकरीता) साधारणत: प्रति माह उपलब्ध तिथीनुसार ८ ते १० हवनपूजा संपन्न होतात. | **नियमित दुपारच्या भोजनातील पदार्थ**<br>चपाती, सुकी भाजी / रस्सा भाजी (कडधान्य), पालेभाजी किंवा फळभाजी, डाळ किंवा आमटी किंवा वरण, साधा भात, गोड पदार्थ (शेवयाची खीर किंवा शिरा किंवा लापशी), कोशिंबीर किंवा सलाड, लोणचे व पापड, श्रींच्या नैवेद्यांकरीता ५१ उकडीचे मोदक<br>सत्यनारायण पूजेचा प्रसाद (प्रति पूजेनुसार एक किलो), श्रींचा नैवेदय |
| | **हवनानिमित्त बनविण्यात येणाऱ्या भोजनातील पदार्थ**<br>पुरी, सुकी भाजी / रस्सा भाजी (कडधान्य), बटाटा वडा किंवा बटाटा भजी, डाळ किंवा आमटी किंवा वरण, पुलाव/मसाले भात, साधा भात, गोड पदार्थ (जिलेबी किंवा शेवयाची खीर किंवा गुलाब जाम ), ताक, चटणी, कोशिंबीर, लोणचे व पापड, श्रींच्या नैवेद्यांकरीता ५१ उकडीचे मोदक, हवनाकरीता तळणीचे ११०० मोदक |

टीप : वर नमुद कामाचा तपशील हा ढोबळ आहे. त्यामध्ये कमी जास्त बदल होऊ शकतो. न्यासाच्या आवश्यकतेनुसार कंत्राटदारास कामाची पुर्तता करावी लागेल.

श्रींचे नैवद्य बनविण्याच्या कामाचा तपशील

श्रींचे नैवेद्य तसेच दररोज अंदाजे २० व्यक्तींकरीता भोजन

१) चपाती ( अंदाजे २० नग)

२) सुकी भाजी किंवा रस्सा भाजी किंवा पालेभाजी किंवा फळभाजी

३) डाळ किंवा आमटी किंवा वरण

४) साधा भात

५) गोड पदार्थ ( शेवयाची खीर, लापशी, शिरा व इतर)

६) चटणी, कोशिबीर किंवा सलाड

७) पापड

वरीलप्रमाणे कोणताही एक एखादा पदार्थ (डीश) बनविल्यानंतर परत तोच पदार्थ (डीश) एक आठवडयानंतर किंवा सर्व पदार्थ (डीश) क्रमाने बनविल्यानंतर परत बनवावी लागेल. तसेच अंगारक संकष्ट चतुर्थी, मंदिरात होणारे उत्सव/कार्यक्रमादिवशी महाप्रसाद विभागाने दिलेल्या सुचनेनुसार वाढीव संख्येनुसार पदार्थ (डीश) बनवावी लागेल.

टीप :

१) वरील नमुद कामाचा तपशील हा ढोबळ आहे. त्यामध्ये कमी जास्त बदल होऊ शकतो. न्यासाच्या आवश्यकतेनुसार कंत्राटदारास कामाची पुर्तता करावी लागेल.

२) श्रींचे नैवद्य तसेच एकुण २० व्यक्तींकरीता बनविण्यात येणारे भोजन हे मंदिरातील दुसऱ्या मजल्यावरील स्वंयपाकगृहात तयार करावयाचे आहे.

३) दुसऱ्या मजल्यावरील संपूर्ण स्वंयपाकगृहाची स्वच्छता व इतर कामे करण्यासाठी ( उदा. भाजी चिरणे/भांडी धुणे, स्वंयपाकगृहाबाहेरील साफसफाई) सफाई कामगार व इतर मदतनीस मंदिराकडून देण्यात येतील.

फर्म / कंपनीच्या लेटरहेडवर)

## निविदाधारकाबाबतची माहिती

१) **संस्थेचे / फर्मचे नांव / व्यक्तीचे नांव** :------------------------------------

अ. पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता :------------------------------------

------------------------------------

------------------------------------

ब. दूरध्वनी क्र. :------------------------------------

क. भ्रमणध्वनी (मोबाईल) :------------------------------------

ड. फॅक्स क्र. :------------------------------------

इ. ई–मेल :------------------------------------

२) **संपर्कासाठी व्यक्तीचे नांव (हुद्दयासह)** :------------------------------------

अ. भ्रमणध्वनी (मोबाईल) :------------------------------------

३) **सद्या कार्य सुरू असलेल्या संस्थेचे नांव व पत्ता** :------------------------------------

------------------------------------

------------------------------------

४) **जीएसटी नोंदणी क्र.** :------------------------------------

५) **आयकर नोंदणी पॅन क्र.** :------------------------------------

निविदाधारकाची सही व शिक्का

(फर्म / कंपनीच्या लेटरहेडवर)

# हमीपत्र

दिनांक – / /२०२४

प्रति,
कार्यकारी अधिकारी,
श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास,
प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

मी/आम्ही ------------------------------------------------ खालील निम्न स्वाक्षरीकार याद्वारे घोषित करतो की,

१. मी/आम्ही कागदपत्रे, अटी व शर्ती, अन्य बाबी तपासून त्याबाबत खात्री केली असून या विषयी आमची कोणतीही शंका नाही.

२. निविदा अटी – शर्ती नुसार अल्पोपहार आणि भोजन बनविण्याचे काम आम्ही निविदा व वाटाघाटीनंतर कायम केलेल्या दराने कोणताही वाद न करता वर्षभर करू.

३. मी/आम्ही नमूद केलेल्या दरामध्ये जीएसटी वगळून सर्व प्रकारच्या शुल्कांची आकारणी समाविष्ट आहे.

४. आमची निविदा स्वीकृत केल्यास आम्ही कराराच्या संपूर्ण कालवधीत न्यासाने विहीत केल्यानुसार बॅंक गॅरंटी देण्यास आम्ही बांधील आहोत.

५. आम्ही याद्वारे हमी देतो की, शासकीय/निमशासकीय/सार्वजनिक उपक्रम यांनी आमच्या काम करण्यासंदर्भात प्रतिबंधात्मक कारवाई आमच्या विरूध्द केलेली नाही.

६. आम्हास माहित आहे की, निविदा स्वीकृत करण्यासंदर्भात न्यासास संपूर्ण अधिकार आहे. तसेच कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचा अधिकार न्यासास आहे.

७. निविदेसोबतची सर्व कागदपत्रे आम्ही काळजीपूर्वक वाचली असून निविदेतील अटी व शर्ती, अन्य बाबी आम्हांस मान्य असून त्या बंधनकारक आहेत.

**निविदाधारकाची सही व शिक्का**

(सनदी लेखापाल यांच्या लेटरहेडवर)

**वार्षिक आर्थिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र**

दाखला देण्यात येतो की, मे. ........................................................................ ..............यांच्या व्यवसायाची वर्ष २०२०–२०२१, २०२१–२०२२, २०२२–२०२३ या आर्थिक वर्षांची उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कालावधी | वार्षिक आर्थिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | वर्ष २०२०–२०२१ | |
| २ | वर्ष २०२१–२०२२ | |
| ३ | वर्ष २०२२–२०२३ | |
| | एकूण उलाढाल | |

दिनांक :– / / २०२४

ठिकाण :–

सनदी लेखापालाची सही/चार्टर्ड अकाउंटन्ट
(नांव/सही शिक्का)

नोंदणी क्रमांक :–

## निविदाधारकाने खालीलप्रमाो प्रत्येक पानावर स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का मारून लिफाफा क्र. १ तांत्रिक निविदा (Technical Bid) सोबत न्यासास सादर करावयाची कागदपत्रे.

| अ.क्र. | अपलोड करावयाच्या कागदपत्रांचा तपशील |
|---|---|
| १ | ई–निविदेसोबत निविदेची किंमत/शुल्क जमा केल्याबाबतची इंटरनेट बॅंकेकडील पावती प्रत |
| २ | बयाणा रक्कम (EMD) जमा केल्याबाबतची इंटरनेट बॅंकेकडील पावतीची प्रत |
| ३ | कंपनी नोंदणी दाखला (Shop Act Licence) / ट्रेडिंग लायसेन्स |
| ४ | पॅन कार्ड |
| ५ | पी. एफ रजिस्ट्रेशनचे प्रमाणपत्राची प्रत. |
| ६ | प्रोफेशनल टॅक्स रजिस्ट्रेशन प्रमाणपत्राची प्रत. |
| ७ | कामगार विमा नोंदणी प्रमाणपत्राची प्रत. |
| ८ | महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळ प्रमाणपत्राची प्रत. |
| ९ | जी एस टी नोंदणी दाखला |
| १० | राष्ट्रीयकृत बॅंकेचा पतदारी दाखला (Solvency Certificate) पान क्र. वरील अट क्र. नुसार |
| ११ | आर्थिक वर्ष (२०२०–२०२१, २०२१–२०२२, २०२२–२०२३) आय. टी. आर. रिटर्नस |
| १२ | आर्थिक वर्ष (२०२०–२०२१, २०२१–२०२२, २०२२–२०२३) जी. एस. टी. रिटर्नस |
| १३ | सन (२०२०–२०२१, २०२१–२०२२, २०२२–२०२३) या ३ वर्षाची मिळून आर्थिक उलाढाल नमुद असणारे सनदी लेखापाल (Charterd Accountant) यांचे प्रमाणपत्र. |
| १४ | हमी पत्र (पान क्र. वरील नमुन्यानुसार) |
| १५ | निविदा उघडण्याच्यावेळी कंपनी / संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात त्याचे नांवाचे प्राधिकार पत्राची प्रत. (Authorisation letter) |

दिनांक – / / २०२४

## मूळ निविदा (वाणिज्यिक Commercial) BOQ

निविदामध्ये खालील बाबी अंतर्भुत करण्यात याव्यात.

निविदाधारकाचे नाव :------------------------------------------

निविदाधारकाचा कायमचा पत्ता :------------------------------------------

------------------------------------------

निविदाधारकाचा कंपनी नोंदणी क्रमांक : ------------------------------------------

जी एस टी क्रमांक : ------------------------------------------

| अ.क्र. | तपशील | (प्रतिदिन भोजनार्थी व्यक्तीची अंदाजे संख्या) | प्रति थाळी दर (कर वगळून) २०२४–२०२६ करिता |
|---|---|---|---|
| १ | अल्पोपहार, चहा, दुपारचे भोजन (कर्मचारी आणि हवनाकरीता) | २७५ व्यक्ती | |

टीप :

१) वर नमुद कामाचा तपशील हा ढोबळ आहे. त्यामध्ये कमी जास्त बदल होऊ शकतो. न्यासाच्या आवश्यकते नुसार कंत्राटदारास कामाची पुर्तता करावी लागेल.

२) वर नमुद मजूरी दरामध्ये न्यासाने विहीत केलेल्या अटी व शर्तीनुसार स्वयंपाकगृहासह संपूर्ण मजल्याच्या साफसफाईचा खर्च समाविष्ट करून दर नमुद करण्यात आलेले आहेत.

निविदाधारकाची सही व शिक्का

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel. 022 - 2422 4438 Fax 022 - 2422 1558 mahaprasad@siddhivinayak.org
www.siddhivinayak.org

# ई–निविदा मागविण्याबाबतची माहिती

१) सकाळचा अल्पोपहार व दररोज दुपारचे भोजन बनविण्याच्या कामाचे कंत्राट देण्याकरीता ई–निविदा ऑनलाईन भरावयाची आहे. ई–निविदेबाबतची सविस्तर माहिती (अटी व शर्ती) तसेच निविदा अर्ज डाऊनलोड करण्यासाठी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर किंवा www.siddhivinayak.org या न्यासाच्या अधिकृत वेबसाईटला भेट द्यावी.

२) अल्पोपहार व भोजन बनविण्याच्या कामाचे कंत्राट देण्याकरीता (पान क्र. वरील) कागदपत्रे तांत्रिक निविदा (Technical Bid) मध्ये अपलोड करावी. तसेच तांत्रिक निविदा (Technical Bid) च्या प्रत्येक पानावर निविदाधारकाची स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का असावा.

३) निविदा अपलोड करतेवेळी निविदा शुल्क (Tender Fee) रक्कम रु. ५,०००/– व बयाना रक्कम (EMD) रक्कम रू. १,००,०००/– इतकी ऑनलाईन इंटरनेट बॅकींगमार्फतच जमा करावी लागेल. बयाना रक्कम कंत्राट करार संपल्यावर ६० दिवसानंतर परत केली जाईल. ई–निविदेची किंमत/शुल्क ना परतावा स्वरुपाचे असेल तसेच बयाना रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज अनुज्ञेय होणार नाही/मिळणार नाही.

४) निविदा शुल्क रक्कम व बयाना रक्कमेबाबतच्या पावती प्रत अपलोड करावी लागेल. निविदा शुल्काची रक्कम व बयाना रक्कमेशिवाय सादर केलेली निविदा स्विकृत केली जाणार नाही.

५) ऑनलाईन इंटरनेट बॅकींगकरीता एस. बी. आय. बॅक किंवा इतर इंटरनेट बॅकींगकरीता एस. बी. आय. MOPS (Multiple Option Payment System) चा वापर करावा.

६) ई–निविदेसोबत राष्ट्रीयकृत वा अनुसुचित बॅकेचा पतदारी दाखला (Solvency Certificate) अपलोड करणे आवश्यक आहे. सदर दाखला एकूण दोन वर्षाच्या निविदा मुल्याच्या अंदाजे ३०% रक्कमे इतका असावा.

७) स्थानिक सहकारी बॅक, पतसंस्था इत्यादीचा धनाकर्ष व धनादेश ग्राहय धरला जाणार नाही.

८) ई–निविदाधारकाने तांत्रिक निविदा (Technical Bid) व बीड ऑफ कोटेशन (BOQ) अशा दोन प्रकारच्या ई–निविदा भरताना काही माहिती अपूर्ण ठेवल्यास/राहिल्यास त्या ई–निविदा कोणतेही

कारण न देता रद्द समजण्यात येतील. अंतिम निर्णय हा श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास यांचेसाठी राखीव असेल.

९) ई–निविदेसोबत अपलोड करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीबाबतचे निकष, अटी/शर्ती, अल्पोपहार व भोजन बनविण्यासंबंधीची माहिती सोबत दिलेली आहे.

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558
mahaprasad@siddhivinayak.org
www.siddhivinayak.org

# अटी व शर्ती

१) अल्पोपहार व भोजन बनविण्याच्या कंत्राटाचा कालावधी हा कामाचे आदेश दिलेपासून ते ३१ मार्च २०२६ पर्यंत (२ वर्षाकरिता) वैध असेल. या कालावधीमध्ये कंत्राटदाराचे काम समाधानकारक नसल्यास तसेच निकृष्ट दर्जाचे काम अथवा कामामध्ये कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन आढळल्यास, कामाचे कंत्राट तात्काळ रद्द करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापन समितीने राखून ठेवलेला आहे.

२) श्रींचे नैवेदय बनविण्यासाठी नेमणूक करण्यात येणाऱ्या आचाऱ्याची निवड न्यासाकडून करण्यात येईल याबाबत आपली कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. त्यामुळे निविदाधारकाने मुळ दरपत्रक सादर करताना श्रींचे नैवेदय बनविण्यासाठी नेमणूक करण्यात येणाऱ्या आचाऱ्याची मजूरी विचारात घेऊन दरपत्रक सादर करावे. श्रींचे नैवेदय बनविण्यासाठी न्यासाकडून नेमण्यात येणाऱ्या आचाऱ्याला वेगळी मजूरी न्यासाकडून देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

३) दररोजचा श्रींचा नैवेदय, संकष्टी चतुर्थी दिवशी रात्रौचा नैवेदय तसेच अंदाजित १५ गुरूजीचे भोजन, सत्यनारायण पूजेचा प्रसाद, श्रींच्या नैवदयाकरीता दररोज उकडीचे मोदक, हवनाकरीता तळणीचे ११०० मोदक बनविण्याची व्यवस्थाही सदर कंत्राट कालावधीमध्ये कंत्राटदारास करावी लागेल यांची नोंद निविदाधारकांनी दरपत्रक सादर करण्यापुर्वी घ्यावी.

४) दररोज श्रींचा नैवेदय, अल्पोपहार व भोजन बनविण्याचे काम नियमित व वेळेतच होण्याकरीता निविदाधारकाचे कार्यक्षेत्र हे मुंबई, नवी मुंबई व ठाणे या परिक्षेत्रातील असावे.

५) ई–निविदाधारकास देवस्थान, चॅरीटेबल ट्रस्ट, नामांकित कंपन्या, हॉटेल्स, रूग्णालये, शासकीय कार्यालये वगैरे ठिकाणी स्वयंपाक, भोजन बनविण्याच्या कामाचा अनुभव असावा.

४) निविदाधारक यांच्याकडे कॅटरींग व्यवसायाचा कमीत कमी ३ वर्षांचा अनुभव असावा. तसेच निविदाधारक संस्थेची कॅटरींग क्षेत्रात मागील ३ वर्षाची मिळून ५० लक्षापेक्षा जास्त उलाढाल असावी.

५) पूर्ण माहिती भरलेली ई–निविदा मुदतीत अपलोड करावयाची जबाबदारी निविदाधारकांवर आहे. मुदतीत न आलेल्या तसेच अपूर्ण ई–निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत. ई–निविदा स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापन समितीने राखून ठेवलेला आहे. त्याबद्दलची कारणे देणे न्यास व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही.

६) कंत्राट कालावधीत नमुद केलेल्या अल्पोपहार व भोजन बनविण्याच्या प्रमाणापेक्षा जास्त प्रमाणात विशेष अल्पोपहार किंवा भोजन व्यवस्था करण्यात आल्यास सदर वाढीव काम मान्य दराने करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

७) अल्पोपहार व भोजन बनविण्याकरीता लागणारा सर्व कच्चा माल, भांडी, गॅस शेगडी/गॅस मंदिर न्यासातर्फे कंत्राटदारास पुरविण्यात येईल.

८) कंत्राट कालावधीमध्ये अल्पोपहार व भोजन तयार करताना कंत्राटदाराच्या निष्काळजीपणामुळे कच्च्या मालाचे, तयार मालाचे किंवा कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास मंदिर न्यासामार्फत आपणाकडून नुकसान भरपाई करून घेण्यात येईल. सदर रक्कम आपल्या बिलातुन वजा करण्यात येईल.

९) कंत्राट कालावधीत कंत्राटदाराने कच्च्या मालासह, स्वयंपाक गृहातील वस्तू व मालमत्ता काळजीपुर्वक तसेच जबाबदारीने वापरणे बंधनकारक असेल.

१०) कंत्राटदाराने संपुर्ण स्वयंपाक गृह, जेवण बनविण्यासाठी वापरण्यात येणारी सर्व भांडी तसेच जेवण संपल्यानंतर संपुर्ण स्वयंपाक गृहाची (टेबल, जेवणाची भांडी/ताटे, मोरी ई. ) धुणे / साफसफाई करणे बंधनकारक राहील.

११) कंत्राटदाराने दररोज अल्पोपहार व भोजन बनविण्यासाठी आचारी, मदतनीस (भाजी साफ करणे, भाजी चिरणे, चपाती बनविण्यासाठी ई.), जेवण वाढण्यासाठी वाढपी तसेच साफसफाई करण्यासाठी लागणारे कर्मचाऱ्यांची यांची संख्या विचारात घेऊन दर सादर करावे.

१२) कंत्राटदाराने नेमलेल्या सर्व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा दाखला (Health Card), कायम रहिवाशी दाखला व ओळखपत्र म्हणून आधारकार्ड कंत्राटदाराने न्यासास देणे आवश्यक आहे.

१३) कंत्राट कालावधीमध्ये सर्व कर्मचाऱ्यांना गणवेश (युनिफॉर्म), हॅन्डग्लोज, शॉवर कॅप, अप्रॉन घालणे बंधनकारक असेल. यासाठी होणारा सर्व खर्च कंत्राटदाराने करावयाचा आहे.

१४) कंत्राट कालावधीत कार्यरत असणाऱ्या सर्व कामगारांची वैद्यकीय तपासणी प्रत्येक सहा महिन्याला करण्यात यावी. यासाठी होणारा खर्च कंत्राटदाराने करावयाचा असून त्याबाबतच्या वैद्यकीय तपासणी अहवालाची एक प्रत महाप्रसाद विभागाला सादर करावी लागेल.

१५) कामाचे कंत्राट अर्धवट सोडून गेल्यास मंदिर न्यासास होणाऱ्या नुकसानाची भरपाई करुन देणे बंधनकारक राहील.

१६) कंत्राटदाराने नियुक्त केलेल्या सर्व कामगार व कर्मचाऱ्यांची सर्व प्रकारची देणी, त्यांचा नोकरी हक्क व इतर बांधिलकी ही सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१७) कंत्राटदाराकडून लावण्यात आलेल्या/नेमलेल्या कामगारांची/मजूरांची सुरक्षितता व जबाबदारी कंत्राटदाराची राहील. कामगार कायदा मजूरी अधिनियम आणि कामगार नुकसान भरपाई अधिनियमातील तरतूदीचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक असेल. यासंबंधाने मंदिर न्यास कोणतीही जबाबदारी स्विकारणार नाही.

१८) कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांकडून गैरवर्तन अथवा न्यासाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास नियमाप्रमाणे नुकसान भरपाई घेतली जाईल. कर्मचाऱ्यांकडून कोंणत्याही प्रकारचे गैरवर्तन झाल्यास याची सर्वस्त्री जबाबदारी कंत्राटदारावर राहील. जुन्या व नव्याने कंत्राटी कर्मचारी नियुक्त करतांना त्यांचे पोलीस व्हेरिफिकेशन करून घेणेबाबत संबंधित ठेकेदारावर बंधनकारक राहील.

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel. 022 - 2422 4438 Fax. 022 - 2422 1558 mahaprasad@siddhivinayak.org
www.siddhivinayak.org

१९) मान्य मजूरी दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ दिली जाणार नाही/मागता येणार नाही. कंत्राटदाराने महाप्रसाद बनविण्याचे काम करावयाचे नाकारल्यास अथवा काम न केल्यास आपली पूर्णतः/अंशतः बयाना रक्कम न्यासात जमा करण्यात येईल. त्याबाबत मंदिर न्यास व्यवस्थापनाचा निर्णय अंतिम राहील.

२०) भोजन व अल्पोपहार बनविण्याचे दिलेले काम वेळेत न केल्यास, लेखी अथवा मौखिक आदेशानुसार दिलेल्या कामाची पुर्तता न केल्यास, तसेच असमाधानकारक काम केल्यास कंत्राटदारास दिलेले कंत्राट कोणतीही पुर्वसूचना न देता तात्काळ रद्द करण्यात येईल. याबाबत मंदिर न्यास व्यवस्थापन समितीचा निर्णय अंतिम राहिल.

२१) ज्यांची निविदा मान्य होईल त्या कंत्राटदाराने कार्यादेश मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत वार्षिक निविदा रक्कमेच्या ५% रक्कम बॅक गॅरेंटी म्हणून २ वर्षासाठी मंदिर न्यासाकडे जमा केली पाहिजे. निविदेसोबत ऑनलाईन इंटरनेट बॅकींगमार्फत सादर केलेली बयाना रक्कम रू. २५,०००/– वजा करून उर्वरीत रक्कम जमा करावी लागेल.

२२) ई–निविदा मंजूर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांत समक्ष येवून स्टॅम्पपेपरवर करारनामा करून देणे निविदाधारकास बंधनकारक राहील. परंतू अशाप्रकारे करारनामा करून दिला नाही अथवा त्याबाबत टाळाटाळ केल्यास कंत्राटदाराने सादर केलेली निविदा न्यासाच्या अटी व शर्तीनुसार करारनामा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. त्याबाबत कुठलीही तक्रार चालणार नाही. निविदेतील अटी व शर्ती कराराचा भाग असतील.

२३) कामाचे आदेश (Work Order) दिल्यानंतर १५ दिवसांचे आत करारनामा करून देणेसाठी रू. ५००/– चा गैरन्यायीक स्टॅम्प पेपर जमा करावा, परंतू अशाप्रकारे करारनामा करून दिला नाही, अथवा त्याबद्दल टाळाटाळ केल्यास कार्यादेश रद्द करण्यात येईल.

२४) कंत्राट आदेश व मजूरी बिलाची रक्कम मंदिर न्यास कार्यालयातून अदा होणार असल्यामुळे सदर व्यवहाराबाबत वाद झाल्यास तो मुंबई कोर्टाच्या न्याय कक्षेत राहील.

२५) श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास आवश्यकतेनुसार एक किंवा एकापेक्षा जास्त कंत्राटदाराला कार्यादेश देवू शकतो.

२६) ई–निविदा भरतांना सर्व प्रकारचे खर्चासह जी. एस. टी वगळून रक्कम भरावी.

२७) ज्या दिवशी ई–निविदा उघडण्यात येणार आहेत त्या दिवशी ई–निविदेद्वरे अपलोड केलेल्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतींचा एक संच तपासणीसाठी मंदिर न्यासास सादर करणे बंधनकारक असेल.

२८) कामगार कायद्यानुसार कामाच्या कालावधीमध्ये निविदाधारक स्वतःच्या खर्चाने कामगार पुरविणार असल्याने त्यांची नियुक्ती करताना न्यासाच्या आस्थापनेशी मालक व नोकर असा संबंध प्रस्थापित होणार/राहणार नाही.

Pavlkar

२९) कमी जास्त दराची कोणतीही ई–निविदा स्विकारण्याचा/नाकारण्याचा अथवा सर्व ई–निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार मंदिर न्यासाने राखून ठेवलेला आहे. त्याबद्दलची कारणे, स्पष्टीकरण देणे श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यासास बंधनकारक राहणार नाही.

३०) या कामासाठी लावण्यात येणाऱ्या कामगारांना किमान वेतन अधिनियम १९४८ नुसार द्यावयाचे किमान वेतन, भविष्यनिधी अधिनियम १९५२, (प्रॉव्हीडंन्ट फंड ॲक्ट १९५२) नुसार प्रशासकीय चार्जेससह भरावी लागणारी अंशदानाची रक्कम तसेच वर्कमॅन कॉम्पेन्सेशन ॲक्ट १९६१ नुसार नुकसान भरपाई वगैरेबाबतची सर्व कायदेशीर जबाबदारी निविदाधारकाची राहील. यापैकी कोणतीही जबाबदारी मंदिर न्यास घेणार नाही. कर्मचारी वेतन कायदा १९३६, कर्मचारी नुकसान भरपाई १९६१, कर्मचारी जबाबदार कायदा १९३८, कर्मचारी नियमीत करणे व काढून टाकणेचा कायदा १९७९ नुसार वेळोवेळी झालेल्या कायदेशीर सुधारणा कंत्राटदारावर बंधनकारक राहतील.

३१) किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत शॉप ॲण्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं. १ मधील किमान वेतन दर पकडण्यात यावेत.

३२) कंत्राट कालावधीत आपल्यामार्फत नेमणुक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्याचा कार्यरत असताना कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास त्याची सर्व जबाबदारी कंत्राटदार कंपनीवर राहील. त्यासाठी कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई न्यासाकडे मागता येणार नाही. कंत्राटदार कंपनीमार्फत संबंधितांचा अपघात विमा/जीवन सुरक्षा विमा कंपनीने उतरवून घेणे बंधनकारक राहील.

३३) निविदाकार यांचेकडील कामगारांना निवासाची व्यवस्था मंदिर न्यासाकडून पुरविली जाणार नाही.

३४) कामासाठी लावण्यात येणाऱ्या कामगारांस कामगार नुकसान भरपाई कायद्यानुसार नुकसान भरपाई द्यावयाची झाल्यास त्याबाबत संपूर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील. त्याचप्रमाणे वर्कमेन कॉम्पेन्सेशन ॲक्ट तरतूदीस अनुसरून कंत्राटी कामगारांची विमा पॉलीसी घेणे व सदर विमा पॉलिसीची प्रमाणित प्रत न्यासाकडे १५ दिवसाचे आत दाखल करणे संबंधित कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

३५) कार्यादेशाप्रमाणे काम करीत असलेल्या कामाचे केव्हाही परिक्षण करण्याचा मंदिर न्यासाला पूर्ण अधिकार राहील.

३६) जीएसटी, व्यवसाय कर, भ. नि. नि. योजना व अन्य कोणत्याही प्रकारच्या करासंदर्भातील जबाबदारी कंत्राटदाराची राहिल.

३७) नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करणेची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

३८) ई–निविदाधारकाने साईटवरील इन्चार्ज किंवा पर्यवेक्षण करणारी व्यक्ती पूर्ण व्यवस्थापन नियोजन व सर्व कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवणेसाठी असेल. त्यांनी मंदिर न्यास कार्यालयाच्या व्यवस्थापक/पर्यवेक्षक/सहा.पर्यवेक्षक याचेबरोबर समन्वय साधला पाहिजे.

३९) ई–निविदे मध्ये नमूद केलेल्या कामामध्ये कपात करणे किंवा वाढविणे याचा अधिकार मंदिर न्यासाकडे राहील.

४०) मंदिर न्यास प्रशासनाने काम प्रमाणित केल्यानंतर व त्यास मान्यता दिल्यानंतर दरमहा देयकाची अंतिम रक्कम अदा करण्यात येईल.

४१) ई–निविदेत नमूद केलेल्या कामासाठी कंत्राटदाराने दुसऱ्या उप कंत्राटदारास काम दिल्याचे आढल्यास कंत्राटदाराची निविदा रद्द करून त्याची मंदिर न्यासाकडे जमा असलेली बयाना रक्कम जमा करण्यात येईल.

४२) मंदिर न्यासाने नेमुन दिलेली कामे ठरलेल्या वेळेत करत नसल्यास, कामात चालढकल करत असल्यास, अथवा समाधानकारक काम करत नसल्यास न्यासकडून कोणतीही पूर्व सूचना न देता कंत्राटदारास दिलेल्या कामाचे कंत्राट रद्द करेल व निविदाधारकाची बयाना रक्कम जप्त करणेत येईल

४३) या कंत्राटाबाबत काही वाद उपस्थित झाल्यास तो प्रथम मुंबई कार्यक्षेत्रातील लवादा (आरबीट्रेशन) मार्फत त्यावरून निवाडा करण्यात येईल. लवादामधील निर्णय अमान्य राहिल्यास मुंबई कार्यक्षेत्रातील न्यायालयाकडे जाता येईल.

४४) कंत्राटदारास सदरचे काम मिळाल्यानंतर त्यांनी नेमलेल्या कर्मचाऱ्याच्या आर्थिक व्यवहारातील रक्कम कमी जास्त झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

४५) भोजन बनविण्यासाठीच्या स्वयंपाकगृहाची पाहणी करण्याकरीता महाप्रसाद विभागात सोमवार ते शनिवार या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.०० वाजेपर्यंत भेट देऊ शकता.

४६) उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार मंदिर न्यास व्यवस्थापन समितीने राखून ठेवलेला आहे. कंत्राटदाराची कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

४७) ई–निविदामधील अटी शर्तीचा व कागदपत्रांचा अभ्यास करून ई–निविदा सादर करावी. ई–निविदेसंबंधी काही शंका असेल तर त्यांनी श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई कार्यालयात दूरध्वनी क्र. ०२२–२४२२४४३८, ०२२–२४२२२०७२ वर संपर्क करावा.

| | |
|---|---|
| श्रीमती.वीणा पाटिल | ९९३०९४२४२८ |
| श्री.डॉ.संदिप राठोड | ९३२४९९९०९४ |
| श्रीमती.उज्वला राणे | ९८२१६००९४१ |

(कार्यकारी अधिकारी)
श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास,
प्रभादेवी, मुंबई.